"जनहिताय सर्वदा"

**महाराष्ट्र शासन**

**गृहनिर्माण विभाग,**

**मंत्रालय (विस्तार),दालन क्र.२५४,मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२.**

**दूरध्वनी क्र.०२२-२२७९३८६२.** Email ID:- zopani2.hou-mh@mah.gov.in

क्रमांक: प्रतिनि-२०२५/प्र.क्र.१३३/झोपनि-२ दिनांक : २८ नोव्हेंबर, २०२५

**प्रति,**

सह/उप सचिव (आस्थापना)
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई या कार्यालयातील सक्षम प्राधिकारी ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत**

संदर्भ :- १) सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन-१२, दिनांक १७.१२.२०१६

२) गृहनिर्माण विभाग अधिसूचना क्र.सेप्रनि-२०२१/प्र.क्र.६८/झोपनि-२, दि.१७.०८.२०२१.

३) गृहनिर्माण विभाग अधिसूचना क्र.झोपुप्रा-२०२५/प्र.क्र.११३/झोपसु, दि.२६.०९.२०२५

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये, राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची, अन्य प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील मंडळ/ महामंडळ निमशासकीय कार्यालये यातील पदावंर संबंधित प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबतचे धोरण सामान्य प्रशासन विभागाने विहित केलेले आहे. संदर्भाधीन क्र.२ व ३ येथील अधिसूचनेनुसार, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र या कार्यालयातील सक्षम प्राधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णय व अधिसूचनेतील तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या कार्यालयात खालील तक्त्यात नमूद केलेली पदे प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत :-

| अ. क्र. | पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | ज्या संवर्गातून पद भरावयाचे आहे त्या संवर्गाची नांवे |
|---|---|---|---|---|
| १. | सक्षम प्राधिकारी-९ | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई | S-२३ : ६७७००-२०८७०० | मंत्रालयीन शासनाच्या अवर सचिव/ उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) /समकक्ष दर्जापेक्षा कमी नसेल असे पद धारण करणाऱ्या किंवा असे पद ज्याने धारण केले असेल अशा पदावरील अधिकारी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | सक्षम प्राधिकारी-१ | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे | S-२३ : ६७७००-२०८७०० | महाराष्ट्र शासनातील अवर सचिव या पदापेक्षा कनिष्ठ नसलेला किंवा त्यास समकक्ष पद धारण करणारा अधिकारी |
| ३. | सक्षम प्राधिकारी-३ | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे | S-२३ : ६७७००-२०८७०० | महाराष्ट्र शासनातील अवर सचिव या पदापेक्षा कनिष्ठ नसलेला किंवा त्यास समकक्ष पद धारण करणारा अधिकारी |

२. तरी सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पदांवर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची नावे त्यांच्या मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालांसह, वैयक्तिक माहिती व ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र इ.माहिती तसेच, संदर्भाधीन शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे याबाबतची माहिती सोबतच्या विवरणपत्रामध्ये दि.२६.१२.२०२५ पर्यंत निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने गृहनिर्माण विभागाकडे कृपया पाठवावीत.

३. सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पत्र त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

४. इच्छूक अधिकाऱ्यांनी आपला अर्ज अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), मंत्रालय मुख्य इमारत, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०००३२ यांच्या नावाने त्यांच्या मुळ विभागामार्फत गृहनिर्माण विभागाकडे सादर करावा.

५. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवरील संदेशफलक या टॅबखाली प्रसिध्द करण्यात आली आहे.

आपला,

(चंद्रशेखर तरंगे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहाय्यक, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई/पुणे/नागपूर
३) सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) निवडनस्ती -(झोपनि-२), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

# विवरणपत्र

| | | |
|---|---|---|
| १. | अधिकाऱ्याचे संपूर्ण नांव | |
| २. | पदनाम/ संवर्ग<br>पदाची वेतनश्रेणी | |
| ३. | सध्याच्या कार्यालयाचे नांव व पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ४. | जन्म दिनांक | |
| ५. | शैक्षणिक अर्हता | |
| ६. | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ७. | ज्या पदावर प्रतिनियुक्तीवर जाण्यास इच्छूक आहे ते पद | |
| ८. | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत) | |
| ९. | संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे ? तसेच, त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार/लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे, | |
| १०. | संबंधित अधिकाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास तपशील<br><table><tr><td>पदनाम</td><td>प्रतिनियुक्ती ठिकाण कार्यालय</td><td>दिनांकापासून ते दिनांकापर्यंत</td></tr><tr><td></td><td></td><td></td></tr></table> | |
| ११. | संबंधित अधिकाऱ्याची निवड झाल्यास त्यास तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल किंवा कसे, | |
| १२. | संबंधित अधिकारी कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या १०% पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत किंवा कसे, | |
| १३. | शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१२.२०१६ व दि.१६.०२.२०१८ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे | |

(आस्थापना अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व स्वाक्षरी)